सा. प्रशासन विभाग
आवक क्र.- 21919
28 JUL 1986
आवक क्र.- 1262
क.अ. उप मु.का.अ, मु.का.अ.

जिल्हा परिषद कर्मचा-यांस वैद्किय सुविधा

हृदयावरील शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपण, रक्ताचा कर्करोग व बायपास करोनरी शस्त्र-क्रियेसाठी अग्रीम मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
निर्णय क्रमांक:-डीएसआर ४९८६/२५९९-सीआर(१८२९)-१७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ११ जुन १९८६.

वाचा:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-एमएजी-१०८३/४११९/पीएच-९अ, दिनांक २७.८.१९८४.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.डीएसआर ४९८३/१५९० सीआर-४९०-१७, दि. १४.३.१९८५.

निर्णय:- शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक डीएसआर ४९८३/१५९० सीआर-४९०-१७, दि. १४.३.१९८५ नुसार जिल्हा परिषद कर्मचा-यांस हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी तसेच मुत्रपिंड रोपणासाठी लागणारी किंमती उपकरणे व औषधे खरेदी करण्यासाठी रु.१०,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करण्यांत येत होते. अग्रीमाची ही मर्यादा वाढविण्याबद्दल अनेक सूचना आलेल्या आहेत.

२. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-एमएजी-१०८४/४१५७/सीआर/१४६/पीएच-९ अ, दिनांक २९.४.१९८५ नुसार (सदरहू आदेश वेगळ्याने जिल्हा परिषद कर्मचा-यांना लागू करण्यांत येत आहे.) चार विनिर्दिष्ट रोगांबाबत शासकीय रुग्णालयात वैद्कीय अद्यावत अशी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे काही विशिष्ट खाजगी रुग्णालयात वैद्कीय उपचार करुन घेण्यांस परवानगी देण्यांत आली असुन त्यासाठीच्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय समजण्यांत आली आहे: त्यामुळे त्या सर्वच रोगांवरील वैद्कीय उपचारासाठी अग्रीम मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.डीएसआर ४९८३/१५९०/सीआर ४९०/१७, दिनांक १४/३/१९८५ नुसार मंजूर करण्यांत आलेले पुर्वीचे आदेश रद्द करुन शासन आता असे आदेश देत आहे की, हे अग्रीम खालील चार आजारांच्या उपकरणाची खरेदी, किंमी औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च अथवा रु.४५,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यन्त रक्कमे इतके मंजूर करण्यांत येईल.

१) हृदयावरील शस्त्रक्रिया (हार्ट सर्जरी)
२) मुत्रपिंड रोपण (किडनी ट्रान्सप्लेन्टेशन),
३) रक्ताचा कर्करोग (ब्लड कॅन्सर)
४) बायपास-कारोनरी सर्जरी

४. हे अग्रीम मंजूर करण्याबद्दलचे सर्वसाधारण कार्यपध्दतीसंबंधीचे नियम हया निर्णया सोबतच्या परिशिष्टामध्ये दिले आहेत.

५. यावर होणारा खर्च संबंधित जिल्हा परिषद कर्मचा-यांना मिळणा-या वेतन व भत्ते ज्या लेखा शीर्षाखाली आदा केले जातात त्या लेखा शीर्षाखाली दाखवावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प.क.३०९/०उप-११/दिनांक.८.५.८६ नुसार निर्गमीत



www.lekhamitra.blogspot.com

शासन निर्णय ग्राम विकास विभाग डीएसआर ४९८५/२५९९-सीआर(१८२९)/१७, चे दिनांक ११ जून ८६ चे परिशिष्ट.

नियम क्रमांक- १: अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकिय - परिचर्या नियम, १९७१ अनुसार जे जिल्हा परिषद कर्मचारी वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत आणि जिल्हा परिषद कर्मचा-यांना हे अग्रीम मंजूर करण्यांत येईल.

ब) अस्थायी जिल्हा परिषद कर्मचा-यांनी दोन स्थायी कर्मचा-यांचा जामीन देणे आवश्यक आहे.

क) जर पती/पत्नी दोघेही जिल्हा परिषद कर्मचारी - असतील तर अग्रीम दोघांपैकी एकालाच मंजूर करण्यांत येईल.

नियम क्रमांक-२: हे अग्रीम फक्त महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकिय परिचर्या) नियम १९७१ अनुसार प्रतिपूर्ती मिळणा-या उपकरणांच्या व शासनाच्या तरतुदीनुसार ज्या उपकरणांच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेव्हांच मंजूर करण्यांत येईल.

नियम क्रमांक-३: जिल्हा परिषद कर्मचा-याने आपल्या अग्रीमाच्या अर्जासोबत उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यातील संभाव्य - खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकीय रुग्णालयाचे - अथवा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.२९.४.८५ अन्वये - मान्यता देण्यांत आलेल्या रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

नियम क्रमांक-४: हे अग्रीम रु.४५,००० च्या आंत मर्यादेपर्यन्त अथवा उपकरणांची खरेदी, किंमती औषधे, व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च यापैकी जे कमी असेल त्या रकमेपर्यन्त मंजूर करण्यांत येईल.

नियम क्रमांक-५: ज्या कारणासाठी जे अग्रीम मंजूर झाले आहे, त्याच कारणासाठी ते उपयोगात आणले गेले आहे हे पाहण्यासाठी ची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

नियम क्रमांक-६: (अ) अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या - कालावधीत वसूल करण्यांत येईल अथवा शासकीय कर्मचा-यांस देय असलेल्या - वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या रकमेतून वसूल करण्यांत येईल.

(ब) जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचा-यांच्या वेतनातून अथवा इतर देय रक्कमेतून अनिवार्य परिस्थिती सोडून एकाच हप्त्यात वसूल करण्यांत येईल.

नियम क्रमांक-७: अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत वसूल झाले नाही तर उर्वरीत बाकी रकमेवर घरबांधणी अग्रीमासाठी आदेय (                ) असलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दराने व्याज आकारण्यांत येईल.

नियम क्रमांक-८: वरील नियमानुसार अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार हे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारींना राहतील.

सही/



www.lekhamitra.blogspot.com